# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** धरमपेठ झोन क्र.2 अंतर्गत प्लॉट क्र. 374 ते बाभुळकर
**{सा.बां.वि. झोन क्र. ०२}** हॉस्पीटल पर्यत सी.सी. रोडचे बांधकाम करण्याबाबतच्या कामाची प्राकलनीय रक्कम रू. 1,64,62,609/— आहे. तसेच या कामाची निवीदा किंम्मत रू. 1,43,32,786/— एवढी आहे. सदर कामाची प्रथम वेळी ऑनलाईन निवीदा मागविण्यात आली असता एकूण 7 निवीदाकार प्राप्त झाले होते. त्यापैकी निम्नतम निवीदाकार मे. स्विटी कंस्ट्रक्शन यांची 31.55 % कमी दराची रू. 98,10,792/— ची निम्नतम निवीदा प्राप्त झाली होती. मे. स्विटी कंस्ट्रक्शन यांना विभागाव्दारे पत्र देवून व भ्रमणध्वनीव्दारे वारंवार संपर्क करून कामगिरी सुरक्षा ठेव (Performance Security Deposit) मागविण्यात आली असता त्यांनी कामगिरी सुरक्षा ठेव (Performance Security Deposit) विभागात सादर केली नाही. करीता मे. स्विटी कंस्ट्रक्शन यांनी सादर केलेली ऑनलाईन अमानत रक्कम (Earnest Money Deposit) जप्त करून तसेच कार्यकारी अभियंता (पंजीयन) यांचे कार्यालयामार्फत एक वर्षाकरीता सदर्हु कंत्राटदाराला म.न.पा. पंजीयन वर्गवारी –2 मधून डिग्रेट करून त्यांची म.न.पा. पंजीयन वर्गवारी –3 मध्ये करण्याबाबत तसेच सदर कामाची फेरनिवीदा मागविण्याच्या प्रश्न विचारात घेणे.

**टिप :–**

1. सदर्हु कामाला मा. मुख्य अभियंता यांच्याव्दारे तांत्रिक मान्यता क्र. CE/PWD/T.S/43/22-23, दिनांक 28/06/2022 नुसार रू. 1,45,27,683/- च्या राशीला तांत्रिक मान्यता प्राप्त आहे.
2. या कामाकरीता रितसर ऑनलाईन ई– निविदा मागविण्यात येईल.
3. सविस्तर टिप्पणी नस्तीत उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 372/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 19/05/2023**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, धरमपेठ झोन क्र. ०२ यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार धरमपेठ झोन क्र.2 अंतर्गत प्लॉट क्र. 374 ते बाभुळकर हॉस्पीटल पर्यत सी.सी. रोडचे बांधकाम करण्याबाबतच्या कामाची प्राकलनीय रक्कम रू. 1,64,62,609/— आहे. तसेच या कामाची निवीदा किंम्मत रू. 1,43,32,786/— एवढी आहे. सदर कामाची प्रथम वेळी ऑनलाईन निवीदा मागविण्यात आली असता एकूण 7 निवीदाकार प्राप्त झाले होते. त्यापैकी निम्नतम निवीदाकार मे. स्विटी कंस्ट्रक्शन यांची 31.55 % कमी दराची रू. 98,10,792/— ची

निम्नतम निवीदा प्राप्त झाली होती. मे. स्विटी कंस्ट्रक्शन यांना विभागाव्दारे पत्र देवून व भ्रमणध्वनीव्दारे वारंवार संपर्क करून कामगिरी सुरक्षा ठेव (Performance Security Deposit) मागविण्यात आली असता त्यांनी कामगिरी सुरक्षा ठेव (Performance Security Deposit) विभागात सादर केली नाही. करीता मे. स्विटी कंस्ट्रक्शन यांनी सादर केलेली ऑनलाईन अमानत रक्कम (Earnest Money Deposit) जप्त करून तसेच कार्यकारी अभियंता (पंजीयन) यांचे कार्यालयामार्फत एक वर्षाकरीता सदर्हु कंत्राटदाराला म.न.पा. पंजीयन वर्गवारी –2 मधून डिग्रेट करून त्यांची म.न. पा. पंजीयन वर्गवारी –3 मध्ये करण्याबाबत तसेच सदर कामाची फेरनिवीदा मागविण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**